


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २९५, रविवार ११ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# अण्णांच्या आचारसंहितेनुसार पारनेरची पत्रकारिता!

■ खासदार नीलेश लंके यांचे गौरवोद्गार ■ राळेगणसिद्धीत खा. लंके यांचा सत्कार
■ पत्रकारांचा स्नेह मेळावा व गुणवंतांचा गौरव ■ अण्णा हजारे यांची उपस्थिती

राळेगणसिद्धी : विशेष प्रतिनिधी

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रत्येक आंदोलनांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करणाऱ्या पारनेर तालुका पत्रकार संघाच्या पत्रकारांनी पत्रकारितेच्या धर्माला डाग लागू दिला नसल्याचे सांगतानाच अण्णांच्या आचारसंहितेनुसार पारनेरचे पत्रकार आपली पत्रकारिता करतात असे गौरवौद्गार खा. नीलेश लंके यांनी काढले.**

पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने खा. नीलेश लंके यांची लोकसभा सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला. या निमित्ताने पत्रकारांचा कौटूंबिक स्नेह मेळावा तसेच पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा अण्णा हजारे व खा. नीलेश लंके यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी खा. लंके हे बोलत होते.

खा.लंके म्हणाले, राजकारण करताना पत्रकारांपासून घाबरून रहावे लागते मात्र पारनेरच्या पत्रकारांची मला भिती वाटत नाही कारण आम्ही सर्वजण एका कुटुंबातील आहोत. पारनेरचे पत्रकार चांगल्या,वाईट गोष्टींवर प्रकाश झोत टाकतात, अन्यायाविरोधात कोणाचीही भिड भाड न ठेवता सामोरे जातात हेच पारनेरच्या पत्रकारितेचे वेगळेपण आहे.

पत्रकारांप्रमाणेच आपणही अण्णांचे विचार डोळ्यापुढे ठेऊन काम करतो. जिल्ह्याबाहेर गेल्यानंतर अण्णांच्या तालुक्यातील लोकप्रतिनिधी म्हणून माझाही ऊर भरून येतो. अण्णांच्या तालुक्यातील म्हणून मलाही आचारसंहितेचे पालन करावे लागते. अण्णांच्या नावाला गालबोट लागणार नाही याची काळजी घेतो. कोठेही गेलो तरी अण्णांचा धाक पाठीशी असतो असे खा. लंके म्हणाले.

यावेळी यावेळी राळेगणसिध्दीचे सरपंच जयसिंग मापारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, मिरजगांवचे सरपंच राम कानवडे, डॉ. बाळासाहेब कावरे, शिवाजीशेठ लंके, सतीश गंधाक्ते, दत्ता आवारी, रायभान औटी, ॲड.गणेश कावरे यांच्यासह पत्रकार, त्यांचे कुटूंबिय, पाल्य आदी उपस्थित होते. प्रा. तुषार ठुबे यांनी सुत्रसंचलन केले. संघाचे माजी अध्यक्ष देवीदास आबूज यांनी अध्यक्षीय सुचना, सुरेंद्र शिंदे यांनी अनुमोदन, उदय शेरकर यांनी स्वागत, विनोद गोळे यांनी प्रास्ताविक तर शरद झावरे यांनी आभार मानले.



■ पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने खा. नीलेश लंके यांचा सत्कार तर पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

### अण्णांच्या आदर्शावर काम सुरू केले

लोकसभा मतदारसंघातील जनतेने मला लोकसभेत पाठविले. संसदेत गेल्यानंतर जमेल का अशी शंका वाटत होती. मात्र कोणतीच गोष्ट अशक्य नाही हे मनात ठेऊन तसेच ज्या अण्णांनी आपल्या आंदोलनाच्या माध्यमातून दिल्लीला हलविले याचा आदर्श डोळयापुढे ठेऊन काम सुरू केले. संसदेत इंग्रजीत शपथ घेतली. शेतकऱ्यांचे, गोरगरीबांच्या घरकुलांचे प्रश्न मांडल्याचे खा. लंके म्हणाले.

### इतिहासाचे साक्षीदार

हे विश्वची माझे घर या उक्तीप्रमाणे अण्णा काम करतात. त्यांच्याच आदर्शावर आपणही काम करतो. पैसा, संपत्ती कमउन, सत्ता भोगण्यापेक्षा ज्या प्रमाणे अण्णांनी समाजासाठी काम केले त्यामुळे त्यांचे नाव आज जगात घेतले जाते. ज्यावेळी इतिहास लिहिला जाईल त्यात अण्णांच्या कार्याची दखल निश्चित घेतली जाईल. या इतिहासाचे आम्ही लहानपणीपासूनचे साक्षीदार आहोत हे आमचे भाग्य आहे.

पत्रकारांच्या सर्व पाल्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा. यशस्वी विद्यार्थ्यांनी तालुक्याचे नाव उज्वल केले. आता राज्याचे, आपल्या देशाचे नाव उज्वल करण्याचे ध्येय ठेवा.

**अण्णा हजारे**, ज्येष्ठ समाजसेवक

### निवडणूकीत पत्रकारांना त्रास

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या पत्रकारांना लोकसभा निवडणूकीत त्रास देण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात हेलपाटे मारण्यास भाग पाडले गेले मात्र पत्रकार कशालाही बधले नाहीत. खा. लंके हे पारनेर तालुक्यात पिछाडीवर राहणार असल्याच्या खोटया बातम्या पसरविल्या जात असताना पारनेर तालुक्यातील पत्रकारांनी मात्र मतदारसंघातील वस्तुस्थितीचे वार्तांकन केले. कारण पारनेर तालुका स्वाभिमानी आहे. तालुक्यातील पत्रकारांना निवडणूकीच्या काळात संघर्ष करावा लागला मात्र त्यांनी कशाचीही अपेक्षा न ठेवता आपला माणूस म्हणून खा. लंके यांना साथ दिली.

**ॲड. राहुल झावरे**
खा. नीलेश लंके यांचे सहकारी

### अण्णांच्या हस्ते गौरव हे भाग्य

पत्रकारांच्या पाल्यांच्या गौरवाचा कार्यक्रम अण्णांच्या हस्ते होतोय हे या मुलांचे भाग्य आहे. कोणतीही गोष्ट एकाएकी होत नाही. कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है या प्रमाणे त्याग केला तर प्रत्येक क्षेत्रात यश दुर नाही असा संदेश खा लंके यांनी दिला.

### समाजाची बांधिलकी जपा

कोणत्याही पदावर गेले तरी समाजाची बांधिलकी जपा. गोरगरीबांना न्याय द्या. माणसांमध्येच परमेश्वर आहे, त्यांची सेवा करा असा कानमंत्र देतानाच पत्रकारांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेल्या उत्तुंग यशचा संपूर्ण तालुक्याला अभिमान असल्याचे खा. लंके म्हणाले.

### समाजाची बांधिलकी जपा

कोणत्याही पदावर गेले तरी समाजाची बांधिलकी जपा. गोरगरीबांना न्याय द्या. माणसांमध्येच परमेश्वर आहे, त्यांची सेवा करा असा कानमंत्र देतानाच पत्रकारांच्या पाल्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेल्या उत्तुंग यशचा संपूर्ण तालुक्याला अभिमान असल्याचे खा. लंके म्हणाले.

### विद्यार्थ्यांनी हजारे, लंके यांच्याकडून प्रेरणा घ्यावी

समाज आणि देशाला दिशा देण्याचे काम ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आणि खासदार नीलेश लंके या दोन विभुतींकडून होत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी. तुमच्या पाठीवर कौतुकाची थाप पडणार आहे.

**मार्तंडराव बुचूडे**, ज्येष्ठ पत्रकार

### अण्णांच्या विचारांवर काम करतो, म्हणून मी संसदेत

अण्णांच्या विचारांवर मी शंभर टक्के काम करू शकत नसलो तरी जास्तीत जास्त त्यांच्याच विचारांवर काम करतो म्हणून मला जनतेने विधानसभेत,लोकसभेत पाठविले. विधानसभेत काम करताना साडेचार वर्षात जे जे करता येईल ते केले. लोकसभेतही मी जनतेच्या हितासाठी काम करणार असून सत्ता ही प्रतिष्ठेसाठी नाही तर जनतेसाठी असते या भूमिकेतून काम करणारा मी असल्याचे लंके म्हणाले.

### हजारे, लंके यांच्या कार्यातून प्रेरणा घ्या

पारनेर तालुका पत्रकार संघाच्या जिव्हाळयाचा हा कार्यक्रम आहे. अण्णा हजारे व खा. नीलेश लंके यांच्या सारख्या महान व्यक्तींकडून तुमचा गौरव होतो आहे हे तुमचे भाग्य आहे. जिद्द, ध्येय बाळगून काम करणारी ही व्यक्तीमत्वे आहेत. तुम्हाला भविष्यात तुमचे ध्येय गाठायचे असेल तर हजारे व लंके यांच्या कार्यातून तुम्हाला प्रेरणा मिळणार आहे.

**संजय वाघमारे**, संस्थापक अध्यक्ष, पारनेर तालुका पत्रकार संघ

### पत्रकारांना आधार मिळाला

गेल्या ७५ वर्षात संसदेत जाण्याची पारनेर तालुक्याला संधी मिळाली नाही. तसा विचारही यापूर्वी कधी झाला नाही. नीलेश लंके यांनी निवडणूकीत उतरण्याचे ठरविले हाच औत्सुक्याचा विषय होता. घरातला माणूस संसदेत जाणार म्हणून सर्वांनी झटून काम केले आणि नीलेश लंके संसदेत पोहचले हा तालुक्यासाठी अभिमान आहे. गेल्या पाच-सात वर्षांच्या कालखंडात लंके यांच्याकडून पत्रकारांना चांगले सहकार्य मिळाले. खऱ्या अर्थाने पत्रकारांना आधार मिळाल्याचे संजय वाघमारे म्हणाले.

### सतत अपडेट रहा

माहीती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्राचा सध्या बोलबाला आहे. मात्र या क्षेत्रात तब्बल अडीच लाख पदे रिक्त आहेत. त्याचे कारण विद्यार्थी वैशिष्ठपुर्ण अभ्यासात कमी पडतात. विद्यार्थ्यांनी सतत अपडेट राहण्याचे आवाहन संजय वाघमारे यांनी केले.

### पत्रकार आणि खासदार असे अंतर नाही !

चांगले काम करणारांच्या पाठीशी आपण नेहमीच उभे राहतो. मी कोणत्याही पदावर नसताना पत्रकारांशी माझे जिव्हाळयाचे संबंध होते. आजही तसेच आहेत. लोकसभा निवडणूकीत माझे कोणाशी बोलणेही झाले नाही तरीही पत्रकारांनी कुटूंबातील सदस्य संसदेत जातोय म्हणून सहकार्याची भावना ठेवली. आज मी खासदार असलो तरी पत्रकार व खासदार असे अंतर कधीही राहणार नाही कारण आम्ही एकाच कुटूंबातील आहोत.

**खा. नीलेश लंके**

### पळणारे कधी हाती लागत नाहीत !

पळणारांच्या मागे पळू नका, कारण ते कधीही हाती लागत नाहीत. जे जवळ आहेत त्यांना दुर ठेवले तर देव कसा पावेल ? माझे कर्म वाईट असते तर मी इथपर्यंत पोहचू शकलो असतो का ? असे सांगत खा. नीलेश लंके यांनी काही अप्रत्यक्ष इशारेही दिले.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी करा

■ खा. नीलेश लंके यांची मंत्री विरेंद्रकुमार यांना निवेदन
■ स्वावलंबन पोर्टलच्या गैरवापराचीही चौकशी करण्याची मागणी

नगर : प्रतिनिधी

**केंद्र सरकारच्या स्वावलंबन पोर्टलचा महाराष्ट्रात झालेला गैरवापर आणि बनावट दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरणाची चौकशी करून कायद्यात दुरूस्ती करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री विरेंद्रकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

यासंदर्भात मंत्री विरेंद्रकुमार यांना दिलेल्या निवेदनात खा. लंके यांनी नमुद केले आहे की, महाराष्ट्रातील स्वावलंबन पोर्टलचा वापर करून योग्य तपासणीशिवाय स्वावलंबन पोर्टलद्वारे युनिक डिसबिलीटी आयडी प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहेत. ही प्रमाणपत्रे केंद्र सरकारच्या बेवसाईटवरून योग्य प्रक्रिया न करता प्राप्त केली होती. हा गंभीर विषय आहे. अद्याप नगर जिल्हा रूग्णालय किंवा महाराष्ट्र राज्य दिव्यांग आयुक्त यांनी यासंदर्भात कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही.

विकलांग व्यक्तींच्या हक्क अधिनियम २०१६ नुसार, केंद्र सरकारने दिव्यांग प्रमाणपत्र जारी करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य विभागाने या उद्देशासाठी सरकारी रूग्णालयील तीन सदस्यीय वैद्यकीय मंडळाची नियुक्ती केली आहे. तथापि, या वैद्यकीय मंडळाने दिव्यांग नसलेल्या



व्यक्तींना ४० टक्के किंवा त्याहून अधिक दिव्यांग ठरवत प्रमाणपत्र दिल्याची उदाहरणे असल्याचे खा. लंके यांनी या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे.

लंके निवेदनात पुढे म्हणतात, बीड जिल्हा परिषदेत असे निदर्शनास आले आहे की, ७० हून अधिक शिक्षकांनी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून दिव्यांग प्रमाणपत्र घेतले आहे. परंतू दुसऱ्या प्राधिकरणाने केलेल्या पुनःपरीक्षणात ते दिव्यांग नसल्याचे आढळून आले आहे. मुंबई उच्च न्यायालयानेही रिअ याचिका क्र. १५१९/२०२३ मध्ये उर्वरीत पान ३ वर






निरोगी आरोग्याचा कानमंत्र...


# निरामय

# मान्सूनमध्ये घ्या काळजी फिटनेसची!



**मातीचा सुगंध अनुभवत पहिल्या पावसात भिजणं ही एक वेगळीच मजा असते. आता तर पावसाच्या सरींनी चांगलाच जोर धरलाय. या चिंब भिजवणाऱ्या पावसाळ्यात आरोग्यदायी राहण्यासाठीच्या काही टिप्स...**

■ आळस झटका, वर्कआऊट करा : पावसाळ्यात एक प्रकारचा आळस अंगात येतो. हा झटकून टाकण्यासाठी वर्कआऊटला पर्याय नाही. सलग तासभर व्यायाम करणं शक्य होत नसेल तर मग मध्ये थोडा ब्रेक घेऊन पुन्हा वर्कआऊट करावं. पावसामुळे जागोजागी होणारी वाहतूक कोंडीमुळे जिम पर्यंत पोहोचता आलं नाही तरीही घरच्या घरी आवर्जून व्यायाम करावा. स्पॉट जॉगिंग, स्कीपिंग, योगासन नक्कीच करता येऊ शकतात.



- ■ फळांची रेलचेल : लिची, चेरी, अलुबुखार, पिच ही फळं फक्त पावसाळ्यातच मिळतात. त्याचप्रमाणे काही खास पावसाळी भाज्याही या दिवसात मार्केटमध्ये येतात. भरभरून जीवनसत्त्व असलेल्या या प्रथिनयुक्त मेजवानीचा आस्वाद सर्वांनी अवश्य घ्यायला हवा.
- ■ गरमागरम पदार्थांवर ताव : गरमागरम सूप, भजी, वडे हे पदार्थ पाऊस पडत असताना खाण्याची गमत वेगळीच असते. या दिवसांत वातावरण थंड असतं आणि म्हणूनच गरम पदार्थ खाणं ही शरीराची गरज असते. असं केल्यानं जंतूसंसर्गामुळे पोट बिघडण्याची शक्यता कमी होते.



- ■ मसाले करतात कमाल : भारतीय स्वयंपाक आणि मसाले हे एक जुळलेलं समीकरण आहे. पूड करून, भाजून किंवा पेस्ट करून या मसाल्यांचा वेगवेगळ्या पद्धतीनं वापर आपण करतो. खमंग सुवास आणि अपेक्षित चव या मसाल्यांमुळे येते. पचनक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठीही ते आपली खूप मदत करतात. त्यामुळे पावसाळा साजरा करताना थोडं तिखट, झणझणीत, मसालेदार खायला काहीच हरकत नाही.
- ■ चहाची हुक्की : आपल्याकडे आदरातिथ्याची निशाणी म्हणजे चहा. चहा आपल्या देशात खूप लोकप्रिय आहे. अनेकांच्या दिवसाची सुरुवात चहाशिवाय होतच नाही. बाहेर मुसळधार पाऊस पडत असताना कटिंग चहाचा घेतलेला आस्वाद म्हणजे एक सुख असतं. चहात घातलेलं आलं आरोग्यासाठी चांगलं असतं.
- ■ चलनवलनाला पर्याय नाही : ऑफिसमध्ये बसून काम करताना किंवा टीव्ही बघताना आपण एकाच जागी खूप वेळ बसतो. दर तासाला उठा आणि थोड्या फेऱ्या मारा. या चलनवलनामुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया व्यवस्थित पार पडते.



**न्यूमोनिया हा शब्दच भीतीदायक आहे. त्यातही लहान बाळांना न्यूमोनिया झाला की, त्यांचे आई-बाबा एकदम घाबरून जातात. न्यूमोनिया प्रसंगी चिंताजनक ठरतो हे खरं असलं तरी त्याला प्रतिबंध करणं शक्य आहे आणि उपचारही शक्य आहेत. योग्य काळजी आणि वेळीच सुरू केलेले उपचार हाच न्यूमोनियावरील उपाय असून त्यामुळे या आजारासंबंधी आपल्या मनात असलेली भीती आधी दूर करायला हवी.**

# न्यूमोनियाची भीती घालवूया!

न्यूमोनिया म्हणजे फुफ्फुसांमध्ये झालेला संसर्ग. हा संसर्ग विषाणूजन्य, जीवाणूजन्य किंवा बुरशीजन्य (फंगल) असू शकतो. यातील विषाणूजन्य न्यूमोनिया अधिक प्रमाणात आढळतो. आपल्या फुफ्फुसांत हवेच्या लहान- लहान पिशव्या असतात. न्यूमोनियामध्ये या पिशव्यांमध्ये संसर्ग होऊन सूज येते आणि त्यात कफ जमतो. श्वास घेण्यास त्रास होणं, खोकताना किंवा श्वास घेताना छातीत दुखणं ही न्यूमोनियाची सामान्य लक्षणं आहेत. पाच वर्षांच्या आतील बालकांमध्ये न्यूमोनियापासून संरक्षण मिळवण्यासाठी लसीकरण हा सर्वांत चांगला उपाय आहे. न्यूमोकोक्कल लस तसंच एचआयबी लस (हिमोफिलिस इन्फ्लूएन्झा) लस जीवाणूजन्य न्यूमोनियाचा प्रतिबंध करते, तर विशिष्ट प्रकारच्या विषाणूजन्य न्यूमोनियावर एच १ एन १ लस (स्वाईन फ्लू) घेण्याचा फायदा होतो. न्यूमोकोक्कल व एचआयबी लशी मोठ्या माणसांना- विशेषतः ६५ वर्षांच्यावरील किंवा इतर आजार असलेल्या व्यक्तींनाही जरूर द्याव्यात.



गेल्या काही वर्षांत न्यूमोनिया लसीकरणाबद्दल जनजागृती वाढल्यामुळे न्यूमोनियाचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत झाली आहे. म्हणजे न्यूमोनिया ही समस्या खरं तर सोडवण्याजोगी आहे. तरीही जागतिक आरोग्य परिषदेच्या (डब्ल्यूएचओ) माहितीनुसार जागतिक स्तरावर दर वीस सेकंदांना एक बालक या संसर्गानं मृत्यूमुखी पडतं. लसीकरणाबरोबरच पुरेशी स्वच्छता पाळणं आणि बालकांना संसर्गजन्य आजार असलेल्या व्यक्तींपासून दूर ठेवणं आवश्यक आहे. बालकाला वारंवार सर्दी-खोकला किंवा ॲलर्जीचा त्रास होत असेल तर घरात हवा शुद्ध करण्याचं यंत्र (एअर प्युरिफायर) बसवून घेण्याचाही फायदा होईल.

## लहान मुलांची विशेष काळजी

ज्या लहान मुलांना वारंवार सर्दी, खोकला होतो, ताप येतो, त्यांची विशेष काळजी घ्यायला हवी. ताप, सर्दी, खोकला यातून प्रत्येक वेळी न्यूमोनिया होईलच असं मुळीच नाही, परंतु बालकांना वेळीच डॉक्टरांकडे घेऊन जाणं, आजाराचा प्रकार व तीव्रतेची खात्री करून घेणं आणि लवकर उपचार सुरू करणं गरजेचं ठरतं. त्यामुळे सर्दी- तापासारखा साधा आजार बळावून पुढे आजाराचं पर्यवसान न्यूमोनियात होणं टाळता येईल. त्यामुळे बाळाला दिसणाऱ्या लक्षणांमध्ये न्यूमोनियासारखी शंका आढळल्यास लगेच बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा.

## वृद्धांचीही घ्या काळजी



म्हातारपण म्हणजे दुसरे बालपण असे नेहमी म्हणतो. न्यूमोनियाच्या बाबतीत सुद्धा बालकांची जेवढी काळजी घ्यावी लागते, तितकीच वृद्ध आणि इतर आजार असलेल्या व्यक्तींचीही काळजी घेणं आवश्यक ठरतं. ज्या वयस्कर मंडळींना श्वसनमार्गाचा किंवा फुफ्फुसांचा जुनाट आजार असतो (उदा. काळा दमा- क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज) किंवा मधुमेह, उच्च रक्तदाब असे इतर काही आजार असतात त्यांना श्वसनमार्गाचा संसर्ग झाल्यावर पुढे न्यूमोनिया होण्याची शक्यता अधिक असते. बुरशीजन्य न्यूमोनिया सामान्यतः कमी आढळतो. काही इतर आजारांमध्ये रुग्णांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. (उदा. केमोथेरपीवर असलेले रुग्ण किंवा मधुमेही रुग्ण) अशा रुग्णांमध्ये बुरशीजन्य न्यूमोनिया उद्भवण्याची शक्यता असते.



# धूम्रपानाचा मेंदूवर परिणाम

**धूम्रपानामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये भारताचा जगात चौथा क्रमांक आहे, हे गेल्या महिन्यात समोर आलेल्या निष्कर्षातून समोर आलं आहे. धूम्रपानामुळे डोक्यापासून ते पायापर्यंत सर्वत्र परिणाम भोगावे लागतात. जागतिक आरोग्य संस्था (डब्ल्यूएचओ) नुसार धूम्रपान हे जागतिकदृष्ट्या मृत्यूचं टाळता येण्याजोगं कारण आहे. सिगारेट व सिगारेटच्या धुरामध्ये ४,७०० हून अधिक घातक रासायनिक संयुगे असतात, जी सर्वाधिक विषारी असतात. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तीच्या तुलनेत वारंवार धूम्रपान करणारी मध्यम वयाची व्यक्ती लवकर मृत्यू पावण्याची शक्यता असते.**

## धूम्रपान आणि मेंदू

सिगारेटमध्ये असलेलं निकोटीन मेंदूवर ताबा मिळवतं; ते मेंदूच्या अशा भागांमध्ये सक्रिय होतं, जे आनंद व समाधानाच्या भावना निर्माण करतात. जेव्हा एखादी व्यक्ती निकोटीनच्या अधीन जाते, तेव्हा त्याला त्यातून बाहेर पडणं खूपच कठीण होऊन जातं. कारण निकोटीनची खूपच सवय लागलेली असते आणि मेंदूला निकोटीनचा पुरवठा झाला नाही, की त्याची तीव्र इच्छा निर्माण होते. यामुळे त्या व्यक्तीची चिडचिड होते, अस्वस्थपणा व तणावात वाढ होते. जास्त प्रमाणात धूम्रपान करण्यानं मेंदू कमजोर होतो व आकुंचन पावतो. त्यामुळे प्रौढ व्यक्तींमध्ये आकलनशक्ती कमी होते आणि हा परिणाम बरीच वर्षे अगदी धूम्रपान करणं सोडून दिलं तरी टिकून राहतो. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींमध्ये स्मृतीभ्रंश व अल्झायमर होण्याची उच्च म्हणजेच जवळपास ७९ टक्के संभाव्यता असते. धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना वारंवार निद्रानाश व झोपेत श्वसनक्रिया बंद होणं असा अनुभव येतो आणि यामुळे पुढे जाऊन स्मृतीभ्रंश होण्याचा धोका वाढतो. वारंवार धूम्रपान करण्यानं बौद्धिक स्तरावर (आयक्यू) देखील परिणाम होतो. मेंदूला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो आणि कार्बनडाय ऑक्साईडचं प्रमाण वाढतं, हिमोग्लोबीनवरदेखील परिणाम होतो. दीर्घकाळ धूम्रपान करण्यानं समस्यांचं विश्लेषण करण्याच्या आणि कामाच्या ठिकाणी विविध बाबी हाताळण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो. सामान्यपणे अशी धारणा असते की, धूम्रपानामुळे लक्ष केंद्रित करणं शक्य होतं, असा केवळ समज आहे; तर याच्या आगदी उलट म्हणजेच धूम्रपानामुळे कार्यक्षमपणे लक्ष केंद्रित करण्याची तुमची क्षमता घटते. मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्यानं वारंवार थकवा जाणवतो.

## धूम्रपान आणि पक्षाघात

### स्टॉप स्मोकिंग

- ■ एस : (सेट अप अ प्लॅन) योजना करा आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.
- ■ टी : (टॉक) तुमच्या डॉक्टरांसोबत बोला.
- ■ ओ : (बी ओपन) तुमच्या भावना व्यक्त करा; तुमचे ध्येय तुमचे कुटुंब, मित्र व सहकाऱ्यांना सांगा.
- ■ पी : (पर्सिस्टंन्स) सातत्य ठेवा. प्रयत्न सोडू नका.

दीर्घकाळ धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना पक्षाघात होण्याचा उच्च धोका असतो. रक्तामध्ये निकोटीन असल्यास रक्त घट्ट बनतं. धूम्रपान करण्यानं धमन्या आतून बंद होण्याची शक्यता बळावते. यामुळे मेंदूला रक्ताचा पुरवठा होण्यास अडथळे येतात आणि त्यामुळे ब्रेन स्ट्रोक होण्याची शक्यता बळावते. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींपेक्षा धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींना निश्चितच अधिक धोका असतो. धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत धूम्रपान करणाऱ्या व्यक्तींचा पक्षाघातानं मृत्यू होण्याचा धोका दुप्पट असतो. तथापि, एखाद्या व्यक्तीनं पाच वर्षांच्या आत धूम्रपान करणं थांबवलं, पुरेसा सकस आहार घेतला, तर कधीच धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तींइतकाच त्यांचा देखील धोका कमी होतो. जरी तुम्ही स्ट्रोकमधून वाचले असाल, तरी त्यातून तुमचं कायमस्वरुपी नुकसान होण्याची शक्यता असतेच.


## धूम्रपान करणं कसं सोडावं?

निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी : एखाद्यानं धूम्रपान सोडलं आहे, पण निकोटीन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण होत असली तर च्युइंग गम, पॅचेस, इन्हेलर्स व नॅसल स्प्रे निकोटीनला पर्याय म्हणून वापरता येतात. तणावापासून सुटका म्हणून बऱ्याचदा धूम्रपान केलं जातं. तर अशा बाबतीत निकोटीन किंवा तंबाखूच्या व्यसनातून बाहेर पडण्याकरिता मेडिकेशन (औषधोपचार) प्रभावीपणे परिणाम साधत मदतगार सिद्ध होऊ शकतं.





# तुमचं यकृत फिट आहे का?



यकृत हे शरीरातील चयापचयाचं केंद्र आहे. आपल्या आहारातली कर्बोदकं, प्रथिने व चरबी या सर्व घटकांचं पचन, विघटन, साठवणूक हे सगळे यकृताच्या कार्यावर अवलंबून असतं. रक्तातील हिमोग्लोबिनच्या चयापचय क्रियेत बिलिरुबिन हा घटक तयार होतो. हे बिलिरुबिन विशिष्ट प्रमाणापेक्षा अधिक झाल्यास घातक असून ते शरीराबाहेर टाकण्याचे कार्य यकृत करतं. हे कार्य नीट झालं नाही तर रक्तातील बिलिरुबिनचं प्रमाण वाढते आणि त्यालाच आपण कावीळ असं म्हणतो. यकृतात काही खूप महत्त्वाची प्रथिनं बनवली जातात. रक्तातील अल्ब्युमिन हे त्यातलंच एक प्रथिन आहे. यकृताचे कार्य बिघडल्यावर अल्ब्युमिन कमी होऊ लागतं. तेव्हा शरीरावर सूज येऊ लागते. त्यामुळे अल्ब्युमिन तयार होणं आणि त्याचं कार्य व्यवस्थित चालणं हे अतिशय महत्त्वाचं असतं. आपल्याला कुठेही छोटीशी जखम झाल्यास रक्त वाहू लागतं. पण, थोड्याच वेळात त्या जागी रक्ताची गुठळी (क्लॉट) तयार होऊन रक्त वाहायचं आपोआप थांबतंही. रक्त वाहणं थांबवण्याचं कार्य काही कोॲग्युलेशन फॅक्टर्स करत असतात आणि त्यातील बहुतेक घटक यकृतात तयार होतात. अनेक संप्रेरकांचे (हॉर्मोन्स) चयापचय यकृताच्या चांगल्या आरोग्यावर अवलंबून असतं. तसेच शरीरातील ड जीवनसत्त्व सक्रिय व्हावं यासाठी मूत्रपिंडाबरोबरच यकृताची भूमिका महत्त्वाची असते. शिवाय बी-१२ हे जीवनसत्त्व यकृतात साठवलं जातं. आपण विविध आजारांवर घेत असलेल्या औषधांच्या चयापचय क्रियेतही यकृताचं कार्य महत्त्वाचं ठरतं.

## लॅबोरेटरी तपासण्या का महत्त्वाच्या?

यकृताचा अगदी थोडा भाग काम करत असेल तरी यकृत आपलं काम रेटून नेतं. त्यामुळे यकृताचं झालेलं नुकसान सौम्य प्रमाणात असेल, तर अनेकदा त्याची काहीही लक्षणं दिसत नाहीत. बहुतेक रुग्णांमध्ये जेव्हा आजार अगदी विकोपास जातो तेव्हाच लक्षणं दिसू लागतात. त्यामुळेच यकृताच्या आजारांच्या बाबतीत लॅबोरेटरी तपासण्या फार फायद्याच्या ठरतात. या तपासण्यामुळे आजाराचं निदान वेळेवर होतं.

## यकृताच्या विविध तपासण्या

लिव्हर फंक्शन टेस्ट या लॅबोरेटरी तपासण्या यकृताचं कार्य कसं चाललं आहे ते सूचित करतात. ही कार्ये बिघडली असतील तर त्याचं कारण शोधावं लागतं. यकृताच्या पेशींमध्येच काही कमतरता असेल तर यकृत व्यवस्थित काम करू शकत नाही किंवा पेशी ठिक असूनही बिलिअरी ट्रॅकमध्ये (बाईल डक्ट) दोष असू शकतो. यकृताचा नेमका आजार लॅबोरेटरी तपासणीवरून कळू शकतो. रुग्णाला उपचार लागू पडत आहेत का, आजाराची तीव्रता किती आहे हे जाणून घेता येतं. वेगवेगळ्या आजारांवरील औषधांचा रुग्णाच्या यकृतावर काय परिणाम होतो, हेही लिव्हर फंक्शन टेस्टद्वारे समजू शकतं. यकृताचं प्रत्यारोपण करण्यापूर्वी रुग्णाला काही लॅबोरेटरी तपासण्या कराव्या लागतात. तसंच प्रत्यारोपणानंतर शरीर नव्या यकृताचा स्वीकार कसा करतं हे समजण्यासाठीच्या तपासण्या महत्त्वाच्या आहेत. अवयव प्रत्यारोपणात रुग्णाला इम्यूनोसप्रेसंट औषधं दिली जातात. त्या औषधांचा परिणाम व औषधांची पातळीही लॅबोरेटरी तपासण्या करून कळते.

## तपासण्या कोणत्या?

- ■ बिलिरुबिन तपासणी : बिलिरुबिनचे टोटल बिलिरुबिन, डायरेक्ट बिलिरुबिन आणि इनडायरेक्ट बिलिरुबिन असे तीन प्रकार असतात. इनडायरेक्ट बिलिरुबिनची पातळी अधिक असेल तर ते यकृताच्या पेशींची कमतरता दर्शवते, तर डायरेक्ट बिलिरुबिन वाढलेले असल्यास बिलिअरी पॅसेजमध्ये काहीतरी अडथळा आहे हे सूचित होतं.
- ■ लिव्हर एन्झाईम टेस्ट : एसजीपीटी (म्हणजेच एएलटी तपासणी) आणि एसजीओटी (म्हणजे एएसटी तपासणी) या दोन लिव्हर एन्झाईम तपासण्यांमधून यकृताच्या पेशींचं झालेलं नुकसान कळतं.
- ■ सिरम प्रोटिन तपासण्या : यात अल्ब्युमिन व ग्लोब्यूलिन या दोन घटकांचं रक्तातील प्रमाण तपासलं जातं.
- ■ कोॲग्यूलेशन फॅक्टर्स : यात प्रोथ्रॉंबिन टाईम ही तपासणी करतात. यकृताच्या आजारांमध्ये कोॲग्यूलेशन फॅक्टर्स नीट तयार होत नसतील तर जखम झाल्यावर रक्त वाहणे थांबण्यास वेळ लागतो. अर्थात प्रोथ्रॉंबिन टाईम वाढतो. यकृताचा तीव्र आजार वा लिव्हर फेल्युअरच्या रुग्णांमध्ये अमोनिया तपासणी करून आजाराची तीव्रता जाणून घेतली जाते.
- ■ इन्फेक्टिव्ह हेपॅटायटिस मार्कर्स : यातून हिपॅटायटिस ए, हिपॅटायटिस बी, हिपॅटायटिस सी आणि हिपॅटायटिस ई यापैकी आजार जाणून घेतलं जातं.

## शॉर्ट न्यूज

### बहिरवाडीच्या शेतकऱ्याचा उपोषणाचा इशारा

■ **नेवासा :** धर्मादाय आयुक्त तसेच नेवासा न्यायालयात जमिनीचा वाद न्यायप्रविष्ठ असतानाही नेवासा तहसीलदार, पोलीस आणि देवस्थानच्या विश्वस्तांनी जेसीबीच्या साह्याने घर पाडले तसेच उभे पीक नांगरून टाकल्याचा आरोप करीत नेवासा तालुक्यातील बहिरवाडी येथील रहिवासी भीमराज शिंदे या शेतकऱ्याने १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. सदरच्या जमिनीत मी घर बांधला असून त्या ठिकाणी राहत असल्याचे देखील भीमराज शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

### आ.रोहित पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

■ **कर्जत :** कर्जत, जामखेड ता. ८- २०२३-२४ ची मंजूर झालेली पीक विम्याची रक्कम कर्जत जामखेड तालुक्यासह सर्वच शेतकऱ्यांना त्वरित देण्यात यावी आणि मागील वर्षी दुष्काळसदृश्य परिस्थिती म्हणून जाहीर केलेल्या दुसऱ्या टप्प्यातील ४१ तालुक्यातील शेतकऱ्यांनाही पहिल्या टप्प्यातील ४१ तालुक्यातील शेतकऱ्यांप्रमाणे नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

### पोलीस दलामध्ये निवड झाल्याबद्दल सन्मान

■ **शेवगाव :** शहरामध्ये एजाज शेख यांची कन्या कलिहा शेख हिची अहमदनगर पोलीस दलामध्ये निवड झाल्याबद्दल संघर्षयोद्धा बबनराव ढाकणे केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ऋषिकेश ढाकणे यांनी कलिहाचा निवासस्थानी जाऊन सन्मान केला. आज प्रत्येक क्षेत्रामध्ये भारतीय स्त्री कुठेही पाठीमागे नाही. मुलांच्या बरोबरीने मुली आज प्रत्येक क्षेत्रात चमकत आहे. कलिहा चा सन्मान करून तिला पुढील वाटचालीस मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या.

### केशर आंबा वृक्ष लागवडीचे लोकार्पण


■ **तळेगाव दिघे :** संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे तळेगाव दिघे येथे ग्रामपंचायत, वृक्षमित्र परिवार डॉर्फ केटल केमिकल इंडिया प्रा. लि. कंपनीच्या डॉर्फ केटल मँगो कप स्पर्धे अंतर्गत राबविलेल्या एक हजार केशर आंबा वृक्ष लागवड उपक्रमाचे लोकार्पण राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. तळेगाव दिघे येथे ग्रामपंचायतने डॉर्फ केटल मँगो कप स्पर्धे अंतर्गत राबविलेल्या एक हजार केशर आंबा वृक्ष लागवड उपक्रमाच्या लोकार्पण प्रसंगी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### संविधान सन्मान रॅली उत्साहात

■ **संगमनेर :** येथे ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त छात्र भारती तर्फे भव्य संविधान रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये संपूर्ण तालुक्यातील हजारो तरुणाई एकवटली होती. प्रत्येकाच्या मुखात क्रांती दिनाच्या निमित्ताने डरने की क्या बात है संविधान हमारे साथ है, भारतीय संविधान जिंदाबाद, लोकशाही जिंदाबाद, धर्मनिरपेक्षता जिंदाबाद घोषणा दुमदुमत होत्या. छात्र भारतीचे राज्य कार्यवाह अनिकेत घुले यांनी संविधान सन्मान रॅलीचे संयोजन केले.

# राहुरीत चोरांच्या टोळीचा धुमाकूळ

## दोन ठिकाणी प्रयत्न, बंद घरात चोरी



**राहुरी : प्रतिनिधी**

**शहरातील खाटीक गल्ली परिसरातील बंद घराचे कुलूप तोडून चोरांच्या ७ जणांच्या टोळीने ७५ हजारांची रोकड व १ लाखांचे सोन्याचे दागिने चोरुन नेले. गुरुवारी (८ ऑगस्ट) पहाटे चार वाजेदरम्यान ही घटना घडली. दरम्यान, या घटनेबाबत समजताच, घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.**

अज्ञात चोरट्यांनी प्रथम खाटीक गल्लीतील किस्मत किराणा दुकान फोडण्याचा प्रयत्न केला. नंतर एका वायरमनचे घर फोडले, मात्र तेथे काहीच न मिळाल्याने चोरांनी आपला मोर्चा मौलाना मुक्ती शेख यांच्या बंद घराकडे वळवला. घराचे कुलूप तोडून चोरांनी आत प्रवेश केला. कपाटातील सामानाची उचकापाचक करून ७५ हजार रुपये व ३ तोळ्याचे सोन्याचे दागिने घेऊन चोरांनी तेथून पोबारा केला. यावेळी खाटीक गल्लीतील कुरेशी नामक तरूण बाहेरगावी जाण्यासाठी घराबाहेर पडताना कुरेशीला चोरांची टोळी दिसून आली. या तरुणाने आरडाओरड केल्यानंतर चोरांनी गलोलीच्या साहाय्याने खडे मारून कुरेशीला जखमी केले.

याबाबत माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे, सहाय्यक फौजदार तुळशीराम गिते, हवालदार सय्यद, पोलिस नाईक संदीप ठाणगे यांनी घटनास्थळी धाव घेतली. नगर येथील श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. ठसे तज्ज्ञांनी घटनास्थळी चोरांचे ठसे मिळवले. ‘सीमा’ नामक श्वानाने मुफ्ती अफजल यांच्या घरापासून जामा मशिदीपर्यंत माग काढला. खाटीक गल्लीत तब्बल तासभर सुरू असलेला चोरांचा धुमाकूळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पोलिस प्रशासनाने या घटनेचा लवकरात लवकर तपास करून चोरट्यांना जेरबंद करण्याची मागणी खाटीक गल्ली परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# जिल्ह्यातहर घर तिरंगा अभियानाला सुरुवात

## जिल्हाधिकारी सालीमठ यांची माहिती

**नगर : प्रतिनिधी**

**केंद्र शासनाने सन २०२२ पासून हर घर तिरंगा अभियान सुरू केले आहे. यंदा या अभियानाचे हे तिसरे वर्ष आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात हर घर तिरंगा हे अभियान ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रम राबवून अत्यंत यशस्वीरित्या राबवा, असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले.**




जिल्हाधिकारी कार्यालयात घरोघरी तिरंगा (हर घर तिरंगा) अभियान राबविण्यासंदर्भात आढावा बैठक पार पडली. झेडपीचे सीईओ आशिष येरेकर, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाले, जिल्ह्यात घरोघरी तिरंगा अभियान आपण सर्वांना साजरे करायचे आहे. विविध शाळा, महाविद्यालये, महिला बचत गट तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून हे अभियान लोकाभिमुख करण्यासाठी यंत्रणांनी विशेष प्रयत्न करावे. या अभियानानिमित्त तिरंगा रॅली, तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांचे आयोजन करावे. सर्व संबंधित यंत्रणांनी मुबलक प्रमाणात ध्वजाची उपलब्धता ठेवावी. त्याचसोबत सर्वत्र ध्वजाचा सन्मान ठेवला जाईल, याची खबरदारी सर्वांनी घ्यावी. सर्व नागरिकांना आपल्या घरांवर, शासकीय, निमशासकीय कार्यालयावर १३ ते १५ या कालावधीत तिरंगा लावण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. नागरिकांनी १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राष्ट्रध्वजासोबतची सेल्फी घेऊन. या संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी सालीमठ यांनी केले.

# ‘लाडकी बहीण नाही,लाडकी सत्ता हवी!’

## बाळासाहेब थोरात यांची अजित पवारांवर टीका

**संगमनेर : प्रतिनिधी**



**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची जनसन्मान यात्रा नाशिकपासून सुरु झाली आहे. या यात्रेच्या माध्यमातून अजित पवार राज्य सरकारच्या योजनांचा प्रचार आणि प्रसार करत आहेत. अजित पवार यांनी लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना ही योजना सुरू राहण्यासाठी तुम्ही आमचे बटण दाबले पाहिजे. तुम्हाला निवडणुकीत महायुतीचे बटण दाबायचे आहे. तिन्ही पक्षाचे बटण दाबू नका. एकच पक्षाचं बटण असणार आहे. महायुतीच्या पक्षाचं बटण दाबा,असे वक्तव्य केले. आता यावरूनच काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी अजित पवारांसह राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.**

थोरात पुढे म्हणाले की, अजित पवारांच्या जनसंवाद यात्रेत सर्वत्र गुलाबी रंग दिसत आहे. यावरून देखील बाळासाहेब थोरात यांनी अजित पवारांना डिवचले आहे. रंग गुलाबी करून काय उपयोग आहे ? लोकांनी सगळं तुमचं अनुभवलेलं आहे. त्याचा ठसा एवढा उमटलेला आहे की, आता गुलाबी करून काही होईल, असं मला वाटत नसल्याची टीका बाळासाहेब थोरातांनी केली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबत बाळासाहेब थोरात म्हणाले की, आम्ही दोन दिवसांपूर्वी काही चर्चा केल्या आहेत. प्रामुख्याने निकष कसे असावे? काय असावे? याबाबत प्राथमिक चर्चा आम्ही केली आहे. त्या पद्धतीने पुढच्या बैठकीत आम्ही आणखी चर्चा करू, लवकर जाग निश्चित होतील. महाविकास आघाडी म्हणून आम्ही २८८ जागा लढू. त्यामध्ये मित्र पक्षांचाही सहभाग असेल. विधानसभा निवडणुकीत आम्ही मोठ्या मताधिक्क्याने जिंकू,असे त्यांनी यावेळी सांगितले.

(पान १ वरून)

### बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी करा

या मुद्यांचा विचार केला. शिवाय महाराष्ट्राचे तत्कालीन वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी महाराष्ट्र विधानसभेत तारांकीत प्रश्नाच्या उत्तरात पुण्यातील ससून रूग्णालयाने बनावअ दिव्यांग प्रमाणपत्र जारी केल्याचे उघड झाल्याचे खा. लंके यांनी म्हटले आहे.

सक्षम बोर्डाने दिलेल्या प्रमाणपत्रांची आजमितीला सक्तीने पडताळणी केली जात नसल्याने हे घडत असल्याचे खा. लंके यांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रत्येक दिव्यांग प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी एक समिती आवष्यक आहे. ज्यात केवळ सरकारी डॉक्टर नाही तर इतर विविध विभागांचे अधिकारी आणि खाजगी तज्ञ डॉक्टरांचा समावेश असेल.
विकलांग व्यक्तींच्या हक्क अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्याचा विचार केला पाहिजे, जेणेकरून दिव्यांग प्रमाणपत्राच्या अंतर्गत कोणत्याही फायद्याचा लाभ घेण्यापूर्वी प्रमाणपत्रांची पडताळणी त्रयस्त मंडळामार्फत सक्तीने केली जाईल असे खा. लंके यांनी या निवेदनात नमुद केले आहे.

**दिव्यांग प्रमाणपत्र जारी करण्यासाठी लंके यांनी सुचविलेल्या दुरूस्त्या**

स्वावलंबी पोर्टलद्वारे देशभरात जारी केलेली सर्व दिव्यांग प्रमाणपत्रे केवळ सक्षम प्राधिकाऱ्यांकडून योग्य तपासणीनंतरच दिली गेली आहेत की नाही याची खात्री करणे आवष्यक आहे. संबंधित व्यक्तींच्या तपासणी नोंदीची समीक्षा करणे महत्वाचे आहे.
योग्य दिव्यांग व्यक्तीला दिव्यांगत्व प्रमाणपत्र न देता अपात्र व्यक्तीला ते मिळवून देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याविरूध्द आणि जाणीवपूर्वक बनावट प्रमाणपत्र मिळविणाऱ्या व्यक्तीविरूध्द गुन्हेगारी प्रकरणे नोंदविण्यासाठी कायदेशीर तरतुदी असाव्यात.
खऱ्या दिव्यांग व्यक्तींच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी या प्रकारच्या गुन्हयांना अजामीनपात्र करावे. या खटल्यांचा निकाल लवकर लावण्याची तरतूद करावी.




## वाचकांच्या लेखणीतून

# नेकीची कमाई



पर्यटकांवर दरोडा घालणारे पाच आरोपी जेरबंद ही गुन्हेगारी क्षेत्रातील बातमी वाचली (पारनेर दर्शन, १० जुलै, शनिवार).
यातील आरोपी १९ ते 30 वर्षे वयोगटातील तरुण आहेत. एखाद्याला लुटून आपली पोळी पिकवून घेणे हे धर्मनिषिध्द आणि आपल्या संस्कृतीला अशोभनीय अशी गोष्ट आहे. आपले कर्तृत्व विधायक क्षेत्रात दाखविण्याऐवजी अशी लुटीची कमाई या तरुणांनी करावी, ही नक्कीच लाजिरवाणी गोष्ट आहे. आरोपींना स्वतःला आणि समाजालाही.
भारतावर त्यावेळी गुलाम वंशाचे राज्य होते. नसिरुद्दीन महमूद हा या वंशाचा सहावा शासक होता. तो सहिष्णू वृत्तीचा होता. शाही खजिन्यातील धन तो केवळ प्रजेसाठीच खर्च करीत असे. इस्लाम धर्माच्या कुरान शरीफ़ या धर्मग्रंथाचा अनुवाद करून तो आपल्या परिवाराचा चरितार्थ चालवीत असे.
एकदा त्याचा नोकर नसिरुद्दीन महमूद बादशहास विनवणी करू लागला, बादशाह सलामत, माझ्या मुलीचं लग्न करायचं आहे. आपण मला काही आर्थिक मदत करावी, अशी आशा व्यक्त करतो.
बादशहा त्याला म्हणाला, या वेळेस माझ्याजवळ माझ्या कमाईचे केवळ दोन सिक्के आहेत. पैसे कमी जरूर आहेत. पण ती नेकीची कमाई आहे. ती वाढती असते. तिला बरकत असते.
नोकराने त्या दोन सिक्क्यांच्या डाळिंबांच्या दोन टोपल्या खरेदी केल्या. त्या घेऊन तो आपल्या गावाकडे निघाला.
तो एका गावाजवळ आला. त्यावेळी त्याला समजले की, या राज्याच्या राजाची राणी सक्त आजारी पडली आहे. राणी बरी होण्यासाठी तिला डाळिंबाचा रस पाजला पाहिजे, असा राजवैद्याने सल्ला दिला आहे. त्या वेळेस राजधानीत डाळिंबाचा तुटवडा पडला होता. म्हणून राजाने दवंडी पिटविली की, जो कोणी डाळिंबे आणून देईल त्याला प्रत्येक डाळिंबागणिक एक हजार सुवर्णमुद्रा दिल्या जातील. नोकर आपल्याजवळच्या डाळिंबाच्या दोन टोपल्या घेऊन राजदरबारात पोहोचला. त्याला डाळिंबागणिक एकेक हजार सुवर्णमुद्रा मिळाल्या.
सारांश, तरुणांनी नेकीच्या मार्गाने आपली कमाई करावी. नेकीची कमाई बरकत देणारी असते म्हणून ही गोष्ट सांगितली आहे. असो.
गुन्ह्याचा छडा लावून आरोपींना जेरबंद केल्याबद्दल स्थानिक गुन्हा शाखेला धन्यवाद. आरोपींची चौकशी होऊन गुन्हा शाबित झाल्यास त्यांना कायद्याने सजा मिळेलच.

■ **नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# जिल्हादंडाधिकाऱ्यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी

## पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई

**नगर : प्रतिनिधी**



**नगर शहरासह जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियमचे कलम ३७ (१) व ३७ (३) नुसार १९ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहे.**

नगर जिल्ह्यात सभा, महासभा, आंदोलनाच्या काळात अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी १९ ऑगस्टपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक आदेशानुसार शस्त्रे, भाले, दंडुके, बंदुका आदी वस्तू बाळगण्यास मनाई आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही व्यक्तींच्या आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे, कोणतेही स्फोटक पदार्थ जवळ बाळगण्यास बंदी आहे. सार्वजनिक तसेच खासगी ठिकाणी निवडणूक प्रचारार्थ तसेच अन्य कारणास्तव सभा घेण्यास व पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास मनाई केली आहे.

हा आदेश शासकीय सेवेतील व्यक्तींना ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य पूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे. त्यांना लागू होणार नाही. तसेच प्रेतयात्रा, धार्मिक कार्यक्रम, सभा, मिरवणूका, लग्न समारंभासाठी ज्यांनी संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक तथा सहायक पोलीस निरीक्षक यांची रीतसर परवानगी घेतली आहे, अशा व्यक्तींना हा आदेश लागू राहणार नाही, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.



# विना तिकीट प्रवासी आढळला मात्र अधिकाऱ्याला पंचनामाच लिहिता येईना !

■ कल्याण-अकोला बसचा टाकळीढोकेश्वरमध्ये पाऊन तास खोळंबा ■ ताटकाळल्याने प्रवासी संतापले

टाकळीढोकेश्वर : संजय मोरे

**कल्याणहून सुटणाऱ्या कल्याण-अकोला या बसची राज्य परिवहन महामंडळाच्या भरारी पथकाने टाकळीढोकेश्वरमध्ये अचानक तपासणी केली असता एक प्रवासी विना तिकीट तर वाहकाजवळ २४० रूपये जास्त आढळून आल्याने कारवाईसाठी तपासणी पथकातील अधिकाऱ्याला पंचनामाच लिहिता येत नसल्याने ही बस तब्बल पाऊन तास टाकळीढोकेश्वरमध्ये खोळंबली. ताटकाळल्याने प्रवाशांनी मात्र संतात व्यक्त केला.**

शनिवारी सकाळी सव्वानऊच्या सुमारास ही बस टाकळीढोकेश्वरमध्ये आली असता तपासणीसाठी नेमण्यात आलेले पथक बसेसची वाटच पाहत होते. अकोला बसमधील प्रवाशांकडील तिकीटांची तपासणी केली असता एक प्रवासी विना तिकीट आढळून आला, तर वाहकाकडेही २४० रूपये जास्त आढळून आले. प्रवासी व वाहक यांनी संगनमताने ही लबाडी केल्याचे उघड झाल्यानंतर पथकातील अधिकाऱ्याला मात्र पंचनामाच लिहिता येईना !

प्रवाशांची तपासणी आणि विना तिकीट प्रवासी आढळल्याने कारवाईसाठी पाऊन तास वेळ खर्च



■ विना तिकीट प्रवासी आढळून आल्याने टाकळीढोकश्वर येथे कल्याण अकोला ही बस पाऊन तास खोळंबली. छाया : संजय मोरे

झाला त्यातच अधिकाऱ्याला पंचनाम्याचे ज्ञान नसल्याने खोळंबलेले प्रवासी संतप्त झाले. अनेक चाकरमान्यांना त्यांच्या इच्छित स्थळी जाण्यास विलंब होत असल्याने बस सोडण्याची मागणी ते करत होते. अनेक चाकरमान्या महिलांचाही त्यात समावेश होता. मात्र पथकातील अधिकारी बस न सोडण्यावर ठाम राहिल्याने अधिकारी व प्रवाशांची बाचाबाचीही झाली.

### त्या अधिकाऱ्यावर कोण कारवाई करणार ?

वास्तविक प्रवाशांच्या वेळेचे बंधन लक्षात घेऊन चालत्या बसमध्ये तिकीट तपासणी करणे बंधनकारक असते. मात्र तपासणी पथकातील अधिकारी एका जागेवर त्यांचे वाहन उभे करून थांब्यावर आलेल्या बसची तपासणी करतात. हे नियमबाहय असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. नियम डावलून प्रवाशांचा पाऊन तास खोळंबा करणाऱ्या त्या अधिकाऱ्यावर कोण कारवाई करणार असा सवाल प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

विना तिकीट प्रवासी तसेच वाहकाकडे २४० रूपये अधिक मिळून आल्याने वाहक तसेच प्रवाशावरील कारवाईची प्रक्रिया सुरू झाली. मात्र अधिकाऱ्याला पंचनामाच लिहिता येईना. शुध्दलेखणाच्या अडचणीमुळे बसमधील प्रवाशांचे चांगलेच मनोरंजन झाले. चालक वाहकांमधून परीक्षा घेऊन भरारी पथकातील अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. चालक वाहकांचे शिक्षण जेमतेम असल्याने साहेब झाले तरी पंचनाम्याचे सोपस्कार पार पाडताना त्यांची चांगलीच फजिती होते. आजवर अशी अनेक उदाहरणे घडलेली आहेत.

# धार्मिक संस्कृतीला पाठबळ देण्याची गरज

## श्रीहरी महाराज पवार यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**धार्मिक संस्कृतीला पाठबळ देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन श्रीहरी महाराज पवार यांनी व्यक्त केले आहे. निघोज आणि पठारवाडीच्या सिमेवर असलेल्या शंभु महादेव डोंगरावर सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात मार्गदर्शन करताना बोलत होते.**



तुषार महाराज गुंड , श्रीहरी महाराज पवार, बबन महाराज थोरात, रविंद्र महाराज खोसे आदिंचे प्रवचने आयोजित केले असून सोमवार दि.१२ रोजी दुपारी एक ते तीन वाजता अशोक महाराज शिंदे यांच्या काल्याच्या किर्तनाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष व मळगंगा कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष अमृताशेठ रसाळ, माजी सरपंच राजाराम कवाद, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सहसचिव विश्वास शेटे, माजी सरपंच ठकाराम लंके , ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, विठ्ठलराव कवाद यांच्या हस्ते विणापूजन करीत या सप्ताहाची सुरुवात करण्यात आली.

शिवशंभो मंडळाचे अध्यक्ष बाबाजी काळे, रोहिदास काळे, भास्कर पवार, कैलास काळे, खंडू लाळगे,पाटीलबा कवाद, भागा काळे, नाथ काळे, संदीप काळे, चेतन काळे, गुलाब काळे, स्वप्नील काळे, बाळू काळे, शंकर काळे, गणेश काळे, सदाशिव काळे, रमेश काळे, संतोष काळे, अनिल कवाद, कैलास कवाद,अक्षय कवाद, रोहित कवाद, सुमन काळे, प्रदिप काळे, धोंडीभाऊ काळे, दादाभाऊ काळे, रवि काळे, विक्रम काळे, लहू काळे, सुभाष काळे, पोपट काळे, बापू काळे, विकास काळे, माऊली काळे, तुकाराम काळे, सुरेश काळे, संजय काळे, जालिंदर काळे, तुषार लंके, यश लंके, विश्वजीत काळे, दत्ता काळे, किरण लाळगे, शिवाजी खोसे, विशाल कवाद, पाराजी सरोदे आदी तसेच शिवशंभो मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच परिसरातील ग्रामस्थ या अखंड हरिनाम सप्ताहासाठी परिश्रम घेत आहेत.

# तिखोलमध्ये रौप्य महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह

## भक्तीपंढरी सोहळयाचे आयोजन

तिखोल : प्रतिनिधी

**तिखोल येथील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे यंदाचे रौप्य महोत्सवी वर्ष असून त्यानिमित्ताने भक्तीपंढरीचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.१० ऑगस्ट रोजी काकडा भजनाने या सोहळयास प्रारंभ झाला.**



शनिवारी दुपारी चार ते पाच वाजण्याच्या दरम्यान संजय महाराज वानखेडे यांचे प्रवचन पार पडले तर सायंकाळी सात ते नऊच्या दरम्यान राजेंद्र महाराज झांबरे यांचे किर्तन झाले.

रविवार दि.११ ऑगस्ट रोजी गोरक्ष महाराज रोकडे यांचे प्रवचन तर संजय महाराज पाचपोर यांचे किर्तन, सोमवार दि. १२ रोजी प्रेमानंद महाराज शास्त्रींचे प्रवचन, महादेव महाराज राऊत यांचे किर्तन, मंगळवार दि. १३ रोजी लक्ष्मण महाराज कोठवळे यांचे प्रवचन, पांडूरंग महाराज घुले यांचे किर्तन, बुधवार दि. १४ रोजी प्रसाद महाराज खिलारी यांचे प्रवचन निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे किर्तन रात्री ८ ते १० या वेळेत होईल.

गुरूवार दि.१५ ऑगस्ट रोजी सुरेश महाराज खेत्रे यांचे प्रवचन तर रामराव महाराज ढोक यांचे किर्तन, दि.१६ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता दिंडी ग्राम प्रदक्षिणा तर संजयनाना महाराज धोंडगे यांचे किर्तन होणार आहे.

### योगिराज महाराज गोसावी यांचे काल्याचे किर्तन

**शनिवार दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत शांतीब्रम्ह एकनाथ महाराज यांचे १४ वे वंशज योगिराज महाराज गोसावी यांच्या काल्याच्या किर्तनाने या रौप्यमहोत्सवी सोहळयाची सांगता होणार असून काल्याच्या किर्तनानंतर सैनिक परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तर सप्ताहादरम्यान दररोज महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.**

### असे आहेत दैनंदिन कार्यक्रम

**पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ ते ३ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ हरिकिर्तन, रात्री ९ नंतर महाप्रसाद व जागर**

# महात्मा फुले विद्यालयाचे विद्यार्थी देश पातळीवर चमकतील

■ अशोक रोहोकले यांचा विश्वास ■ गुरुकुल पालक मेळावा संपन्न



भाळवणी : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील महात्मा फुले विद्यालयात गुरुकुल पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्कूल कमिटीचे सदस्य संदिप रोहोकले होते. स्कूल कमिटी ज्येष्ठ सदस्य अशोक रोहोकले उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यालयात चालू असलेल्या नवीन उपक्रमांचे कौतुक केले, विद्यालयातून गेलेले विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतून चमकत आहेत व यापुढे देश पातळीवरील स्पर्धेत मुलं चमकतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिस्त असेल तरच विद्यार्थी घडतात असेही ते म्हणाले.**

विद्यालयाचे प्राचार्य बी.एस. नाईकवाडी यांनी आपल्या मनोगतात संस्थेने सुरू केलेल्या गुरुकुल प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी नुसता शैक्षणिक दृष्ट्या प्रगत होऊन उपयोग नाही तर तो समाजामध्ये शिस्तप्रिय पाल्य म्हणून घडवण्यासाठी पालकांच्या सहकार्याची विद्यालयास आवश्यकता आहे, पालकांनी सर्व शिक्षकांवर विश्वास ठेवून सहकार्य करावे असे आवाहन केले. यावेळी पालक मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. उदमले उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्या विषयी पालकांना जागृत केले.

यावेळी आदिनाथ रोहोकले, श्रीम. पद्मा पोकळे रोहिणी रोहोकले, राजू दावभट यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सौ. पी.एस.रोहोकले यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. तांबोळी सर व आभार श्रीम. भालेराव यांनी मानले. मेळाव्यासाठी भाळवणी परिसरातील बहुसंख्य पालक, माजी केंद्रप्रमुख श्री. कदम, प्रभारी पर्यवेक्षक श्री मुळे व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# पठारवाडीच्या गावकऱ्यांविषयीची आपुलकीची भावना कायम

## सचिन वराळ पाटील यांची प्रतिक्रिया

निघोज : प्रतिनिधी

**पठारवाडी ही निघोजची वाडी हा पंचवीस वर्षांपूर्वीचा इतिहास कुणीही विसरु शकत नाही पठारवाडी गावकऱ्यांविषयी आम्हाला सदोदित आदर असून गेली पंचवीस वर्षांपुर्वीची आदराची भावना कायमस्वरूपी आमच्या मनात असल्याची प्रतिक्रिया संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी व्यक्त केली आहे.**



गेली दोन दिवसांपूर्वी पठारवाडी येथील ग्रामसभेत ठेकेदार मोहन सुपेकर यांनी वराळ कुटुंबाला टार्गेट करण्याचा प्रयत्न केला यावर प्रतिक्रिया देताना वराळ पाटील यांनी म्हटले आहे की ठेकेदार मोहन सुपेकर हा कशा प्रकारे धंदे करीत आहे याची माहिती सर्वांनाच आहे. समाजात फसवाफसवी करण्याचा प्रयत्न जास्त काळ जनता सहन करीत नाही सुपेकर हा लोकांना कशाप्रकारे ठगवीत आहे याची माहिती सर्वांनाच आहे. काही तथाकथित सामाजिक कार्यकर्ते तसेच परिसरातील काही लोकं याला खतपाणी घालून लोकांना भडकवण्याचे काम करीत आहेत ही शोकांतिका आहे.समाजामध्ये भांडणे लावण्याचे काम हितकारक नाही.

सध्या पठारवाडीत जे काय चालले आहे याचा माझ्याशी काही संबंध नाही असे असताना या ठेकेदाराने वराळ कुटुंबाला टार्गेट केले हा एक दुर्दैवी प्रकार आहे. गेली पन्नास वर्षांपासून सहकारमहर्षी किसनराव वराळ यांच्या पासूनवाडीचे आणि वराळ कुटुंबाचे संबंध घरोब्याचे आहेत. स्वार्थासाठी आम्ही कधीही पठारवाडीत आलो नाही. विकास कामांमध्ये नेहमीच पठारवाडी ग्रामस्थांना साथ देण्याचे काम आमच्या हातून होणार आहे हा माझा ग्रामवासियांना शब्द आहे. निघोज बरोबरच पठारवाडीचा विकास झाला पाहिजे ही माझी व्यक्तीश भावना आहे आणि ती जपण्याचे काम मी करणार असल्याचे प्रतिपादन वराळ पाटील यांनी व्यक्त केले आहे.

# सुप्याच्या आठवडे बाजारात विद्यार्थ्यांनी घेतले व्यवहार ज्ञानाचे धडे !

## न्यू इंग्लिश स्कूलची क्षेत्रभेट संपन्न



सुपा : प्रतिनिधी

**रयत शिक्षण संस्थेच्या,न्यू इंग्लिश स्कूल, सुपा विद्यालयातील इयत्ता पाचवी ते सातवी या गुरुकुल प्रकल्पातील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट बुधवार दि.७ ऑगस्ट रोजी आठवडे बाजार सुपा येथे आयोजित करण्यात आली .विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचे प्रत्यक्ष धडे मिळावेत यासाठी या क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले.**

आठवडे बाजाराची संपूर्ण माहिती मिळवण्याच्या दृष्टीने प्रत्येक विद्यार्थ्याने २५ प्रश्नांची प्रश्नावली तयार केली त्या आधारे आठवडे बाजाराची माहिती संकलित करण्याचे काम तसेच प्रत्यक्ष खरेदी करण्याचा अनुभव व आनंद विद्यार्थ्यांनी घेतला .या क्षेत्रभेटीसाठी वर्गशिक्षक श्रीम.पाडेकर एस. बी, श्रीम. तांबोळी ए. एस, सौ. धामणे व्ही.वाय यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

रयत शिक्षण संस्थेमध्ये प्रत्येक विद्यालयात सुरू असलेला रयत गुरुकुल प्रकल्प या सहशालेय ऐच्छिक उपक्रमांतर्गत अनेक उपक्रम राबवले जातात.विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेची भीती कमी होण्यासाठी दररोज वीस मिनिटे स्पोकन इंग्लिश हा उपक्रम राबविला जात आहे तसेच एससीईआरटी व एनसीईआरटी या अभ्यासक्रमातील तफावत दूर करण्याच्या दृष्टीने ब्रीजिंग कोर्सचे आयोजन या उपक्रमांतर्गत केले जाते.त्यामुळे या प्रकल्पातील विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे एनसीईआरटी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याची आवश्यकता नाही .पुढील शैक्षणिक वर्षापासून बारावी नंतरच्या विविध स्पर्धा परीक्षांसाठीची पूर्वतयारी म्हणून फाउंडेशन कोर्स गुरुकुल प्रकल्पांतर्गत राबवला जाणार आहे.

सर्व स्पर्धा परीक्षांची तयारी,विविध क्षेत्रातील तज्ञांची व्याख्याने,असे अनेक उपक्रम गुरुकुल प्रकल्पाच्या माध्यमातून राबविले जातात.या क्षेत्रभेटीचे नियोजन प्रकल्प प्रमुख श्री. येणारे एस.पी , सहाय्यक प्रकल्प प्रमुख श्री.बर्डे एस.आर यांनी केले.या क्षेत्रभेटीसाठी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री.राऊत बी.एस यांचे मार्गदर्शन लाभले.

# देवीभोयऱ्यात हर घर तिरंगा अभियानाची लगबग

## ग्रामपंचायतीच्या वतीने राष्ट्रध्वजाचे वितरण

देवीभोयरे : प्रतिनिधी

**स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाची देवीभोयऱ्यामध्ये जय्यत तयारी सुरू झाली असून येत्या १३ ऑगस्ट रोजी उभारण्यासाठी देवीभोयरे ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामस्थांना राष्ट्रध्वजाचे वितरण करण्यात आले.**



राष्ट्रभाषा, राष्ट्रगीत आणि राष्ट्रध्वज या ती गोष्टी आपल्या देशाचे राष्ट्रीयत्व दर्शवितात. ही नुसती प्रतीके नाहीत तर त्यातून आपल्या राष्ट्राची अस्मिता प्रकट होत असते. या राष्ट्रीय अस्मितेचा स्फुल्लिंग प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या उरात सदैव बाळगला पाहिजे या जाणीवेतून भारतातील प्रत्येक गावामध्ये स्वातंत्रदिन तसेच प्रजासत्ताक दिन मोठया अभिमानाने साजरा करण्यात येतो.

यावेळी ग्रामस्थांना राष्ट्रध्वज उभारणे तसेच राष्ट्रध्वज उतरविण्यासंदर्भात मार्गदर्शन सुचनांची माहीतीही देण्यात आली. मंगळवार दि.१३ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता राष्ट्रध्वज सन्मानाने आपल्या घरावर उभारायचा आहे. स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता राष्ट्रध्वज सन्मानाने उतरवून तो सन्मानानेच घरामध्ये ठेऊन द्यायचा असल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने सुचना देण्यात आल्या. ज्यांना राष्ट्रीय ध्वज मिळाले नाहीत त्यांनी ते ग्रामपंचायत कार्यालयातून घेऊन जाण्याचे आवाहन ग्रामपंचायतीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

राष्ट्रध्वज वितरण कार्यक्रमास अशोक मुळे, सरपंच शंकर सरडे, उपसरपंच विठ्ठल सरडे, माजी सरपंच संपत वाळुंज, दत्तात्रेय मुळे, गणेश बेलोटे, ग्रामपंचायतीचे सदस्य प्रमोद आहेर, सचिन जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# पारनेर पब्लिक स्कुलमध्ये नागपंचमीचा उत्साह

■ मुख्यमंत्री माझी शाळा अभियानांतर्गत उपक्रम
■ वारूळाची प्रतिकृती आणि पारंपारीक वेशभुषेतील चिमुरडयांचे आकर्षण

पारनेर : प्रतिनिधी

**भारतीय संस्कृतीचे जतन करून विद्यार्थ्यांना विविध सणांची माहीती व्हावी या हेतूने पारनेर पब्लिक स्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या नागपंचमी उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये उत्साह पहावयास मिळाला.**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या स्पर्धात्मक अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यातही सहभागी झालेल्या या विद्यालयात श्रावणात येणाऱ्या नागपंचमी हा पहिला सण ज्युनिअर के जी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी मोठया उत्साहात, आनंददायी वातावरणात साजरा केला. वारूळाची प्रतिकृती व पारंपारीक वेशातील चिमुरडे हे या सणाचे आकर्षण ठरले.

चिमुरडयांच्या हस्ते नागदेवतेची पुजा करण्यात येऊन पुजेनंतर विद्यालयातील महिला शिक्षकांनी नागदेवतेची आणि वारूळाची महती वर्णन करणारी गीते सादर केली. आपण नागपंचमी हा सण का साजरा करतो या संदर्भातील वैज्ञानिक आणि पारंपारीक अख्यायीकाही सांगण्यात आल्या.

श्रावण महिन्याच्या पंचमीला नागपंचमी हा सण साजरा करण्यात येतो. नागदेवतेला प्रसन्न करून देण्यासाठी नागदेवतेची पुजा केली जाते. कालिया नागाचा यमुना नदीच्या पात्रामध्ये भगवान श्रीकृष्ण परभाव करून सरक्षित नदीपात्राबाहेर आले तो दिवस श्रावण शुध्द पंचमीचा होता. त्या दिवसापासून ही नागपुजा प्रचलीत झाली. त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीमध्ये नागाच्या पुजनाला व सर्प पुजनाला महत्व प्राप्त झाले. नाग आणि सर्प हे दोघेही शेतकऱ्यांचे मित्र आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या शिक्षिका वर्षा नवले, सुनिता खोडदे, प्रियंका ठोंबरे, मनिषा फातले, विजया लांडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाच्या अध्यक्षा सविता म्हस्के, प्राचार्य गिताराम म्हस्के, योगेश पिसे, किसन पुंड, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वनिता रेपाळे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन करून उपस्थितांचे आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com